Research Paper
Presented Sept 17 2017

# समर्थ रामदास यांच्या साहित्यातील संज्ञापन कौशल्ये

**१. प्रस्तावना -**

समर्थ रामदास हे संत पंचकातील एक महत्त्वाचे संत म्हणून ओळखले जातात. 'संत' या उपाधीप्रमाणे 'समर्थ' ही उपाधी त्यांना वापरली जाते. जी त्यांना सर्वार्थाने सार्थ ठरते. त्याची विविध कारणे आहेत. दैनंदिन व्यवहाराला प्राधान्य देणारे आणि त्यानुसार तत्संबंधी चिंतन करणारे तसेच समाजाला तशी पद्धतशीर शिकवण देणारे रामदास हे त्यांच्या कार्यामुळे वेगळे ठरतात.

महाविद्यालयात 'संज्ञापन कौशल्ये' आणि 'व्यवस्थापनाची मूलतत्त्वे' हे विषय शिकवत असताना ह्या आधुनिक ज्ञानशाखांचा शोध रामदासांच्या साहित्यासंदर्भात घेऊ लागले. या दोन्ही शाखांतील अनेक तत्त्वे समर्थ साहित्यात विशेषतः दासबोधात आढळली.

समाजकल्याणाचा विचार करताना रामदासांनी समाजाला जागृत करण्यासाठी, सुसंस्कारित करण्यासाठी जे कार्य केले, समाजास जी शिकवण दिली ती आजच्या काळातही तितकीच उपयुक्त आहे. रामदासांनी १७ व्या शतकात आपल्या वाङ्मयाद्वारे मांडलेले विचार २१ व्या शतकातही तसेच लागू होताना दिसतात. आज प्रत्येक क्षेत्रात संज्ञापन कौशल्य आणि व्यवस्थापन हे परवलीचे शब्द झाले आहेत.

संवादकौशल्य, प्रभावी संवाद, नेतृत्व विकास, संघटना बांधणी हे महत्त्वाचे विषय रामदासांनी सतराव्या शतकात आपल्या कार्यातून मांडले आहेत. यातून रामदासांच्या व्यक्तिमत्त्वातील लोकनेता, उत्तम सुसंवादक, संघटक, व्यवस्थापक हे पैलू प्रकर्षाने जाणवले.

**२. सुसंवादक -**

'संवाद' म्हणजे एकाच्या डोक्यातील माहिती, कल्पना, वृत्ती, प्रवृत्ती, श्रद्धा, विश्वास इत्यादीचे चित्र दुसऱ्याच्या डोक्यात केवळ प्रक्षेपित करण्याची कृतीच नव्हे तर संबंध प्रस्थापनेचे ते शास्त्र किंवा कला ठरते'. ही संवादाची व्याख्या डॉ. श्रीपाद जोशी यांनी केली आहे.

आधुनिक संवाद शास्त्रानुसार - संवाद तोंडी बोलून साधला गेला तर तो मौखिक संवाद ठरतो. व्यक्तीने लिहून आपले विचार मांडले तर तो लिखित संवाद ठरतो. हे दोन्ही संवाद भाषेच्या आधारे केले जातात, म्हणून त्यास भाषिक संवाद किंवा शाब्दिक संवाद म्हणतात.

मानवी जीवनात सर्वात जास्त महत्त्व संवादाला असते हे रामदासांनी जाणले होते. रामदासांनी मोठी संघटना उभी केली. त्याकरिता आवश्यक ते मनुष्यबळ जमविले, प्रभावीपणे आपले म्हणणे मांडले. ते आपल्या साहित्याद्वारे साधलेल्या संवादातूनच.

रामदासांनी आपल्या समर्थ संप्रदायाच्या प्रचारार्थ ठिकठिकाणी प्रवचनं, कीर्तन केली. तोंडी तथा मौखिक उपदेशाद्वारे रामभक्ती, रामकथा गायली. स्वधर्माची आवश्यकता पटवून दिली. हे सर्व त्यांनी कधी प्रमाणभाषेचा तर कधी लोकभाषेचा आधार घेत केले. स्वधर्म, राष्ट्रप्रेम, रामभक्ती हे सर्व त्यांच्यापर्यंत पोहोचविले.

रामदासांनी दासबोधात मांडलेले विचार हे आधुनिक संवादशास्त्राशी साम्य दाखविणारे आहेत. दासबोधात वक्तृत्व कलेविषयी विवेचन करताना -

असो वक्तृत्वाचा अधिकार । अल्पास न घडे प्रत्योत्तर ।
वक्ता पाहिजे साचार । अनुभवाचा ।।

वक्त्याने वक्तृत्वाची कास धरण्यापूर्वी आधी त्यासाठी आवश्यक ती पात्रता अंगी वाणली पाहिजे. ज्याचे ज्ञान व्यासंग आणि अनुभवप्रचिती अल्प म्हणजे कमी आहे त्याला वक्ता होण्याचा अधिकार नाही.

कठिण शब्द बोलू नये । कठिण आज्ञा करू नये ।
कठीण धीरत्व सोडू नये । काही केल्या ।।

कोणाला कठोर बोलू नये, कोणाला पाळण्यास कठीण अशी आज्ञा करू नये. काहीही झाले तरी आपले धैर्य कायम ठेवावे.

जगामध्ये जगमित्र । जिव्हेपासी आहे सूत्र ।
कोठे तरी सत्पात्र । शोधून काढावे ।।

सर्वांना स्नेहभावना उत्पन्न होईल अशी कला आपल्या जीभेत असायला हवी. आपल्या बोलण्याने कोणी दुखावणार नाही याची काळजी घेत मवाळ व मृदु शब्दांत बोलले पाहिजे.

दासबोधाप्रमाणेच मनाच्या श्लोकांतही संवादाविषयी रामदास म्हणतात -

जनी वाद वेवाद सोडूनि द्यावा ।
जनी सूसंवाद सुखे करावा ।
जगी तो चि तो शोकसंतापहारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।

निरर्थक होणारा वादविवाद सोडून द्यावा. परंतु तात्त्विक सुख संवाद मात्र मजेने करावा. लोकांशी केलेला असा संवाद शोक आणि संताप नाहीसे करणारा असतो. जेथे वाद संपून संवाद घडतो, तो हितकारकच ठरतो.

तुटे वाद संवाद त्याते म्हणावे ।
विवेके अहंभाव त्याते जिणावे ।
अहंता गुणे वाद नाना विकारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।

जेव्हा वाद संपतो तेव्हा संवाद सुरू होतो. माणसाने विवेकाच्या सहाय्याने अहंकार जिंकावा. अभिमानामुळेच वादामध्ये विकार प्रकट होतात. असा वाद जिथे संपतो तो संवाद हितकारकच ठरतो.

अशा प्रकारे रामदासांनी मनाच्या श्लोकातून अतिशय सहज व सोप्या भाषेत सर्वसामान्यांना समजेल असा अर्थवाही जनसंवाद साधला आहे.

महाराष्ट्र धर्म आणि समर्थ संप्रदाय या दोन्हीच्या प्रसारासाठी रामदासांनी ही वाङ्मय निर्मिती हेतू पुरस्सर केली होती. आधुनिक लिखित संज्ञापनाच्या दृष्टिकोनातून हे वाङ्मय अभ्यासताना समर्थ रामदासांनी साहित्याद्वारे संदेश दिला आहे, उपदेश केला आहे असे आढळून आले.

आपण कोणाशीसंवाद साधत आहोत याचे भान ज्या वक्त्यास असते तो उत्तम सुसंवादक असतो हे रामदासांच्या बाबतीत तंतोतंत लागू ठरते. संवादातील श्रवणाचे महत्त्व, बोलण्यातील विनम्रता, प्रभावी वक्तृत्व हे गुण रामदासांनी अधोरेखित केले आहेत. दासबोधाद्वारे गुरुशिष्य संवाद, मनाच्या श्लोकांआधारे जनसंवाद, पत्रसंवाद, व्यक्ती व्यक्ती संवाद यातून रामदास स्वतः उत्तम सुसंवादक होते हे स्पष्ट होते.

**३. नेता -**

व्यवस्थापनाला जो सतत प्रगतीपथावर नेत राहतो आणि सर्वांना बरोबर घेऊन सहकाऱ्यांकडून काम करून घेणाऱ्यास नेता म्हणतात. व्यवस्थापक हा सर्व घटकांना कार्यप्रवृत्त करणारा असतो.

नेतृत्वाची व्याख्या-जॉर्ज टेरी यांनी पुढीलप्रमाणे केली आहे. "नेतृत्व हे लोकांना प्रभावित करण्याची

प्रक्रिया असून त्यांना सामूहिक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी प्रवृत्त करणे होय".

आधुनिक व्यवस्थापन शास्त्रात नेतृत्वाची वैशिष्ट्ये व नेतृत्वाचे गुण पुढीलप्रमाणे सांगितले आहेत. (१) सांघिक कार्याशी निगडीत (२) चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व (३) परिस्थितीनुरूप नेतृत्व शैली (४) ज्ञान व बुद्धिमत्ता (५) संज्ञापन कौशल्य (६) मानवी संबंध कौशल्य (७) सहनशक्ती.

नेतृत्वाची वैशिष्ट्ये व गुण रामदासांनी त्यांच्या दासबोधात ठिकठिकाणी सांगितले आहेत.

बोलता खरे चालतो खरे । त्यास मानिती लहानथोर ।
न्याय अन्याय परस्परे । सहजचि कळे ।।

ज्याचे बोलणे, चालणे खरेपणाचे असते त्यास लहानथोर सारखाच मान देतात. त्यातून न्यायाचा किंवा अन्यायाचा पक्ष कोणता हे परस्पर पण सहजच लोकांना कळून येते.

नेतृत्व म्हणजे वर्चस्व गाजवणे नाही तर नेतृत्वाचा खरा अर्थ मार्गदर्शन करणे, संघटनेचे नियमन करणे, प्रभुत्व मिळविणे असा होय. नेतृत्व म्हणजे मनाचा विशाल दृष्टिकोन हवा. नेत्यातील गुणांची चर्चा करताना रामदास म्हणतात -

दोष देखोनि झाकावे । अवगुण अखंड न बोलावे ।
दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करूनी ।।

दोषांवर पांघरूण घालावे, दुसऱ्याचे दुर्गुण सदोदित बोलत बसू नये, दुर्जन अपराधात सापडले असता (त्यांना शासन न करता) त्यांच्यावर परोपकार करून त्यांना सोडून द्यावे.

फड नासोचि ने दावा । पडिला प्रसंग सावरावा ।
अतिवाद न करावा । कोणी येकासी ।।

समुदायाची घडी बिघडू देऊ नये, आलेला प्रसंग निभावून न्यावा, त्यातून पार पडावे, कोणाशीही अतिवाद करू नये.

नेतृत्व हे सांघिक कार्याशी निगडीत असते. तरच चळवळीतून संघटना उभी राहते हे सांगताना रामदास म्हणतात -

सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।
परंतु येथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ।।

जे जो उद्योग करील त्याला प्रत्येकाला सत्ता चालविण्याचे सामर्थ्य मिळविता येईल. पण त्याने आपल्या ठिकाणी भगवंताचे अधिष्ठान मानले पाहिजे. तो विचाराने, कार्याने एकरूप झाला पाहिजे.

रामदासांनी सांगितलेले नेतृत्व हे भक्कम वैचारिक पायावर उभारलेले आहे. ते समाजाला घडविण्यासाठी विकसित करण्यासाठी आणि प्रगती करण्यासाठी आहे.

पुढे रामदास काही विशेष खबरदारी घ्यावयास सांगतात. यातून त्यांचे चातुर्य व दूरदृष्टी हे गुण दिसून येतात.

समुदाव पाहिजे मोठा । तरी तनावा असाव्या बळकटा ।
मठ करुनी ताठा । धरूं नये ।।

मोठा समुदाय करायची हौस असेल, आवड असेल तर (तणावा) आक्रमकशक्ती दांडगी असायला हवी. मठ करून त्याच्या गर्वात (ताठ्यात) राहू नये.

दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे ।
सज्जनापरिस आळवावे । महत्त्व देउनी ।।

दुर्जन, दुष्ट लोक असतील तर त्यांना ओळखून असावे. पण त्यांचा दुर्जनपणा (आपणांस कळल्याचे)

प्रकट करू नये. इतकेच नव्हे तर त्यांना सज्जनापेक्षाही अधिक मोठेपणा देऊन प्रसन्न ठेवावे.

वरील सर्व उदाहरणांवरून एक गोष्ट सिद्ध होते, हे सर्व गुण रामदासांच्या व्यक्तिमत्त्वात, त्यांच्या नेतृत्वात होते. संवादकौशल्य, इतरांना समजून घेणे, कार्यक्षम व्यवस्थापकत्व, योग्य नियंत्रण होते. म्हणून स्वतः महंताचे महंत होते. रामदासांमध्ये ही उत्तम नेतृत्व रुपी व्यवस्थापकाची लक्षणे आढळतात.

### ४. संघटक -

कोणत्याही व्यवस्थापनाचे अंतिम कार्य उद्दिष्टपूर्ती हे असते. त्यामुळे उद्दिष्टपूर्ती करण्यासाठी तयार केलेली व्यावसायिक कार्याची चौकट म्हणजे संघटन होय.

व्यवस्थापनशास्त्रात ऑलिव्हर शेल्डन यांची व्याख्या प्रसिद्ध आहे. "संघटना म्हणजे व्यक्तींनी किंवा एखाद्या व्यक्तीसमूहाला करावयाच्या कार्यात संयोग स्थापन करण्याची क्रिया, की ज्यामुळे ते कार्य कार्यक्षमतेने पद्धतशीरपणे व समन्वय प्रस्थापित करून पूर्ण केले जाईल."

संघटना प्रत्यक्षात कार्यरत होण्यासाठी जे प्रभावी नेतृत्व असते त्यास संघटक म्हणतात. संघटकाच्या प्रभावी नेतृत्वामुळे संघटनेची एकूण कार्यक्षमता वाढण्यास मदत होते. तसेच त्यामुळे संघटनेतील मानवी संबंध सुधारतात. ऑर्डवे टीड यांनी संघटकाची व्याख्या करताना म्हटले आहे की, "संघटकाकडे असलेला असा गुण की ज्यामुळे इतरांकडून काम करून घेणे शक्य होते. संघटकाच्या प्रभावी नेतृत्वामुळे काम करण्यासाठी इतर स्वेच्छेने तयार होतात."

वरील विचारांचा शोध समर्थ रामदासांच्या साहित्यात घेतला. त्यावेळी असे आढळले की, रामदासांचे वाङ्मय हे समाज प्रबोधन, समाज संघटन यासाठी लिहिलेले दिसते. सामाजिक परिवर्तन घडविण्यासाठी समाज एकत्र करून समाजाचे संघटन करणे त्यांनी महत्त्वाचे मानले.

या संघटनेकरता रामदासांनी अफाट लोकसंग्रह केला. लोकसंग्रह करताना, माणसे जमवताना कशी जमवावी, कशी वेचावी हे सांगितले. लोकांशी कसे बोलावे, त्यांना कसे पारखावे हे सांगितले. लोकसंग्रह करीत करीत रामदासांनी भारतभर साधारण अकराशे मठ स्थापन केले असे म्हटले जाते.

दासबोधातून रामदासांनी संघटन शास्त्रातील अनेक मूलभूत तत्त्वे आचरणात आणलेली दिसतात. महाराष्ट्राच्या परंपरेपेक्षा वेगळा विचार त्यांनी मांडला.

लोकी लोक वाढविले । जेणे अमर्याद झाले ।
भूमंडळी सत्ता चाले । गुप्तरूपे ।।

एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीशी जोडता येते, दुसऱ्याने तिसऱ्याशी आणि हा पसारा वाढत जातो. संघटनेतही हे सूत्र राबविल्यास कार्यकर्त्यांची एक फळी या संघटकापाठी उभी राहते आणि जनाधार असलेला लोकनेता, संघटक म्हणून ओळखला जातो.

आधी मनुष्य ओळखावे । योग्य पाहून काम सांगावे ।
निकामी तरी ठेवावे । एकीकडे ।।

रामदास म्हणतात - सर्वप्रथम माणसांची कुवत पहावी. माणसे पारखल्यानंतर जी आपल्या कार्यासाठी उपयुक्त नाहीत त्यांना बाजूला सारावे. कार्यकर्त्यांच्या कुवतीप्रमाणे त्यास काम न दिल्यास निकामी लोकांची नेमणूक केली जाऊ शकते व ते संघटनेस मारक ठरू शकते.

मुख्य सूत्र हाती घ्यावे । करणे ते लोकांकरवी करवावे ।
कितेक खलक उगवावे । राजकारणामध्ये ।।

संघटनेत राजकारण करताना चतुराईने मुख्य नियंत्रण संघटकाने म्हणजेच नेत्याने आपल्या हाती ठेवावे. मात्र अनेक धूर्त, चतुर (खलक) लोकांना सामील करून घेत लोकांकडून ते कार्य करवून घ्यावे.

2018

उदंड उपासनेची कामे । लावीत जावी नित्यनेमे ।
अवकाश कैंचा कृत्रिमे । करावयासी ।।

नित्यनेमाने करायची अशी उपासनेची पुष्कळ कामे संघटनेच्या मागे लावून द्यावीत. लोक त्यात गुंतून राहिले की मग कुरापती काढण्यास, लबाडी करण्यास कुणास सवड राहत नाही.

बहुतांचे समाधान राखावे । बहुतांस मानेल ते बोलावे
विलग पडो नेदावे । कथेमध्ये ।।

पुष्कळ कार्यकर्ते व लोक यांचे समाधान होईल असे कार्य करावे, उपदेश करावा. पुष्कळांना आवडेल व पसंत पडेल असेच बोलावे. वागण्या बोलण्यात विसंगती येऊ देऊ नये, असे रामदासांनी आवर्जून सांगितले आहे.

वरील सर्व ओव्यांमधून असे दिसून येते की, रामदासांनी उत्तम संघटना बांधली. त्याआधारे महंत व शिष्य घडविले, त्यांच्यामार्फत समाजमन घडविले. यासाठी स्वतः संस्थापक व सुसंघटक बनले.

**५. समारोप -**

रामदासांच्या कार्यामुळे व तत्त्वज्ञानामुळे त्यांना 'समर्थ' ही उपाधी कशी सार्थ ठरते हे आपण पाहिले. त्यांनी पारमार्थिक उपदेशापेक्षा ऐहिक जीवनातील गल्बला सोडवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. म्हणून संतपंचकात रामदास वेगळे ठरतात.

रामदासांनी सांगितलेला प्रयत्नवाद व व्यवहारवाद हा आधुनिक काळातील व्यवस्थापन शास्त्र, संज्ञापन शास्त्र या कसोट्यांवर उतरणारा आढळला. रामदासांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वात आढळलेले पैलू हे आजच्या काळाशी सुसंगत असे म्हणजे सुसंवादक, नेता, संघटक असे आढळले.

हे सर्व करण्यासाठी रामदासांनी आपल्या वाङ्मयाचा आधार घेतला. अत्यंत प्रभावी शैलीत, वक्तृत्वपूर्ण भाषेत समाजातील सर्व स्तरांतील लोकांशी संवाद साधला. यातूनच त्यांच्या साहित्यातील सॉफ्ट स्कील्स आणि प्रभावी संवाद कौशल्ये आढळली. रामदासांनी सांगितलेले हे विचार आजच्या काळातही उपयुक्त ठरतात, मार्गदर्शक ठरतात. यातूनच त्यातील कालातीतता सिद्ध होते. हेच समर्थ रामदासांचे वेगळेपण आहे.

**संदर्भग्रंथ -**

१. डॉ. जोशी श्रीपाद भालचंद्र - जनसंवाद आणि जनमाध्यम सैद्धांतिक संकल्पना, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्र.आ. २०००.
२. डॉ. पवार सुधाकर - संवादविश्व, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वि.आ. २००६.
३. पांगारकर ल.रा. (संपा/अनु.) - सार्थ दासबोध, ढवळे प्रकाशन, मुंबई- अठरावे पुनर्मुद्रण १९९३.
४. पांगारकर ल.रा. (संपा/अनु.)- मनोबोध सार्थ मनाचे श्लोक, ढवळे प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण २०१०.
५. शेठ रुपाली आणि इतर - व्यवस्थापनाची तत्त्वे आणि कार्ये, डायमंड पब्लिकेशन, पुणे, ऑगस्ट २००९.
६. सराफ मोहन- व्यवस्थापनाची मूलतत्त्वे, विद्या प्रकाशन, नागपूर, प्र.आ. २००२.

**- प्रा विमुक्ता राजे**
जोशी-बेडेकर महाविद्यालय,
ठाणे